
# मनोगत - सौ. शोभा पांडे

प्रिय वाचक बंधु भगिनींनो नमस्कार,

मागील नऊ वर्षांपासून बरोबर एक तारखेला प्रकाशित
होणारा गुलमोहर हस्तलिखिताचा हा जुलै व ऑगस्ट महिन्यांचा अंक
काही तांत्रिक अडचणीमुळे थोड्या विलंबाने प्रकाशित होत आहे त्याबद्दल
आम्ही अत्यंत दिलगीर आहोत

यावर्षीचे जुलै व ऑगस्ट हे महिने सदैव
स्मरणात राहणारे आहेत. अधिकस्य अधिकम् फलम् देणारा पुरुषोत्तम
मास व त्याला जोडून आलेला श्रावण महिना अत्यंत पवित्र व
मंगलमय वातावरण निर्माण करणारा होता. रिमझिमणारा पाऊस,
हिरवा शालू पांघरलेली सृष्टी, हिरवा शेला खांद्यावर घेतलेले डोंगरकडे
त्यातून धो धो कोसळणारे पाण्याचे प्रवाह असा विलोभनीय निसर्ग
या सर्वांचे प्रतिबिंब आपणाला या अंकातून दिसणार आहे. व्यासंगपूर्ण लेख
भावपूर्ण कविता व विचार प्रवर्तक साहित्य यासोबत उत्तम चित्रकारिता,
सुबक सुलेखन याचा ही प्रत्यय या अंकात आपण अनुभवणार आहोत.
श्री. उपाध्येकाका व श्री. अरविंद लिमयेकाका यांचा वरदहस्त आमच्या
पाठीशी आहे. गुलमोहराला विविध अंगाने सजविणारे, नटवणारे व मुर्त
रूप देणारे श्री. तेजस लिमये अनेक वर्षांपासून हे कार्य समर्थपणे
सांभाळत आहेत. श्री. प्रकाश देशपांडे यांचे रेखीव हस्ताक्षर व चित्रकला
हे या अंकाचे वैशिष्ट्य आहे. सर्व लेखक, कवी व साहित्यकार आणि
रसिक वाचक हे आमचे आधार आहेत. सर्वांचे मनःपूर्वक आभार.

धन्यवाद.



संपर्कासाठी :-

1) श्री. अरविंद लिमये - 9146025724
2) श्री. किशोर जोशी - 7720092620
3) श्री. तेजस लिमये - 9637418458
4) सौ. विजयाताई जोशी - 8308694751
5) सौ. शोभाताई पांडे - 7769889638

या संकलित अंकातील लेख, कविता वा कथा यातील मते लेखकांची स्वतःची असून संकलक मंडळातील सदस्य त्या मतांशी सहमत असतीलच असे नाही.